सेल्फी काढताना चौघे वाहून गेले; एकाला वाचवण्यात यश

नांदेड : किनवट तालुक्यात पैनगंगा नदीपात्रातील प्रसिद्ध असलेल्या सहस्रकुंड धबधब्याच्या पाण्यात सेल्फी काढण्यासाठी नदीपात्रात उतरलेल्या हैदराबादच्या आठ पर्यटकांपैकी चौघे वाहून गेले. मंगळवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास ही घटना घडली. रफीयोद्दीन, अकरम, सोहेल व नदीम हे चौघे जण पाण्याच्या प्रवाहासोबत वाहून गेले. यापैकी नदीमने नदीपात्रातील एका दगडाला पकडून ठेवले होते. त्याला वाचवण्यात यश आले. अन्य तिघांचा शोध घेण्याचे काम मंगळवारी सायंकाळपर्यंत सुरू होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

चिदम्बरम यांच्या अटकेसाठी 'ईडी'ला परवानगी


नवी दिल्ली : आयएनएक्स मीडिया मनीलॉण्डरिंगप्रकरणी माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांची चौकशी करण्याची परवानगी मंगळवारी दिल्ली न्यायालयाने सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) दिली. ईडी तिहार कारागृहात बुधवारी चिदम्बरम यांची चौकशी करू शकते आणि गरज भासल्यास त्यांना अटकही करू शकते, असे न्यायालयाने स्पष्ट केले. चिदम्बरम यांची चौकशी करण्याची परवानगी द्यावी ही ईडीची याचिका विशेष न्यायाधीश अजयकुमार कुहार यांनी मान्य केली. राऊस अॅव्हेन्यू न्यायालयाच्या संकुलात चिदम्बरम यांची चौकशी करण्याची अनुमती आधी 'ईडी'ने मागितली होती.

मार्गारिट अॅटवूड, बर्नार्डिन एव्हरिस्टो यांना बुकर पुरस्कार

पीटीआय, लंडन


इंग्रजी साहित्यविश्वात मानाच्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बुकर पुरस्काराच्या निवडीसाठी यंदा सर्वाधिक चुरस झाली. परीक्षक मंडळाने अंतिम निकालाच्या दिवशी पाच तासांहून अधिक काळ चर्चा करीत नियमांना बगल देऊन अखेर कॅनेडियन लेखिका मार्गारिट अॅटवूड आणि आफ्रो-ब्रिटिश लेखिका बर्नार्डिन एव्हरिस्टो यांच्या पुस्तकांना संयुक्तपणे पुरस्कार जाहीर केला.

दोघींचे नाव पुकारण्यात आल्यानंतर त्या हातात हात घालूनच पुरस्कार स्वीकारण्यासाठी सामोऱ्या गेल्या. अॅटवूड म्हणाल्या की, हा पुरस्कार मला एकटीलाच मिळाला असता तर जरा अडचणीचे वाटले असते, पण आता माझ्याबरोबर एव्हरिस्टो याही आहेत. १९९२ मध्ये अशीच परिस्थिती निर्माण झाली असताना पुरस्काराचे नियम बदलून दोन जणांना एकाच वेळी पुरस्कार द्यायचा नाही असे ठरले होते, पण या वेळी पाच तासांच्या चर्चेनंतर परीक्षक समितीचे प्रमुख पीटर फ्लॉरेन्स यांनी आम्ही हा नियम बदलत आहोत असे जाहीर करून दोघींना पुरस्कार जाहीर केला.



नवा इतिहास...

अॅटवूड यांची टेस्टामेण्ट्स आणि एव्हरिस्टो यांची 'गर्ल, वुमन, अदर' या कादंबऱ्यांनी अखेर बुकर पुरस्कारावर मोहोर उमटवली. एकूण पन्नास हजार पौंडांचा हा पुरस्कार दोघींना विभागून दिला जाणार आहे. बुकरच्या नियमानुसार हा पुरस्कार विभागून देता येत नाही, पण या वेळी परीक्षकांनी अपवाद करून दोन्ही पुस्तके तोडीस तोड असल्याने विभागून पुरस्कार दिला आहे. अॅटवूड या बुकर पुरस्कार पटकावणाऱ्या सर्वांत वयोवृद्ध विजेत्या असून एव्हरिस्टो यांच्या रूपाने प्रथमच कृष्णवर्णीय महिलेस हा मान मिळाला आहे.



एव्हरिस्टो यांची आठवी कादंबरी

'गर्ल, वुमन, अदर' ही एव्हरिस्टो यांची आठवी कादंबरी आहे. प्रत्येक प्रकरणात १२ पात्रे गुंफलेली आहेत. ती बहुतांश कृष्णवर्णीय ब्रिटिश महिलांची आहेत. शंभर वर्षांचा कालपट यात असून समकालीन साहित्यात आजपर्यंत जे चित्रण आले नाही असे जीवन यात रेखाटले आहे. एव्हरिस्टो यांनी नाटकातून कारकीर्द सुरू केली असून त्यांनी १९८२ मध्ये 'थिएटर ऑफ दी ब्लॅक वुमन' ही संस्था स्थापन केली. याशिवाय त्यांनी 'दी स्प्रेड दी वर्ड रायटर डेव्हलमेंट एजन्सी' ही संस्था सुरू केली.

एव्हरिस्टो यांनी सांगितले की, 'आता माझे साहित्य बऱ्याच मोठ्या समुदायापर्यंत पोहोचणार आहे. कृष्णवर्णीय महिलेला हा पुरस्कार प्रथमच मिळाला आहे. इतर कुणाला या पुरस्काराचे कदाचित अप्रूप वाटणारही नाही, पण माझ्यासाठी ते आहे. आणखी कृष्णवर्णीय महिलांनी हा पुरस्कार मिळवावा अशी अपेक्षा आहे.'

अॅटवूड यांनी सांगितले की, 'बर्नार्डिनबरोबर हा पुरस्कार मिळाला याचा आनंद आहे, तिने कृष्णवर्णीय महिलांना मोठा आत्मविश्वास दिला आहे.'

अॅटवूड यांना 'द ब्लाइंड अॅससिन' या पुस्तकासाठी यापूर्वी बुकर पुरस्कार मिळाला होता. नंतर 'द हँडमेड्स टेल' या पुस्तकाला नामांकनही मिळाले होते. १९८५ साली आलेल्या या पुस्तकातील कथानकाचे अमेरिकेतील डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने निर्माण केलेल्या वातावरणाशी साधर्म्य आहे. त्यामुळे २०१७ नंतर या पुस्तकाला नव्याने लोकप्रियता मिळाली. त्यावर टीव्ही मालिका आली. त्यानंतर त्यांनी 'द हँडमेड्स टेल'चा उत्तरार्ध 'द टेस्टामेण्ट्स'मध्ये मांडला. या पुस्तकाच्या १ लाख प्रती ब्रिटनमध्ये विकल्या गेल्या असून अमेरिकेत पहिली प्रत पाच लाख इतक्या मोठ्या संख्येची छापण्यात आली. प्रकाशनानंतर चार आठवड्यांत ब्रिटनमध्ये सर्वाधिक खपाचा गेल्या चार वर्षांतील विक्रम या कादंबरीने मोडला आहे.

काश्मीरमधील 'एसएमएस' सेवा स्थगित

पीटीआय, श्रीनगर

काश्मीरमध्ये पोस्ट-पेड भ्रमणध्वनी सेवा सुरू केल्यानंतर काही वेळातच खबरदारीचे उपाय म्हणून एसएमएस सेवा बंद करण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

काश्मीरमध्ये ७२ दिवसांनंतर इंटरनेट सुविधेविनाच पोस्ट-पेड भ्रमणध्वनी सेवा सोमवारी सुरू करण्यात आली. मात्र सायंकाळी ५ वाजता एसएमएस सेवा स्थगित करण्यात आली. खबरदारीचे उपाय म्हणून सोमवारी सायंकाळी एसएमएस सेवा बंद करण्यात आल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले. मात्र त्याबाबत सविस्तर तपशील देण्यास अधिकाऱ्याने नकार दिला.

पाकिस्तानमधील एका नागरिकासह दोन दहशतवाद्यांनी सोमवारी रात्री ८ वाजता शोपियान जिल्ह्यात एका ट्रकचालकाची गोळ्या घालून हत्या केली, तर सफरचंदांच्या बागेच्या मालकाला बेदम मारहाण केली. फळांची वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्याचे पाहून आलेल्या नैराश्यातून ही हत्या आणि मारहाण करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

दरम्यान, पाकिस्तान पुरस्कृत छुपे युद्ध आणि दहशतवाद संपुष्टात आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करून निर्णायक संघर्ष सुरू केला आहे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरगांव येथे स्पष्ट केले. यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये दीर्घकाळ शांतता नांदेल, असेही ते म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या (एनएसजी) ३५ व्या स्थापनादिन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून शहा उपस्थित होते.

डॉ. अब्दुल्ला यांची कन्या, बहीण पोलिसांच्या ताब्यात

श्रीनगर : केंद्र सरकारने अनुच्छेद ३७० रद्द करून जम्मू-काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशांत विभाजन केल्याच्या निषेधार्थ येथे निदर्शने करणाऱ्या सहा महिलांना पोलिसांनी मंगळवारी ताब्यात घेतले त्यामध्ये माजी मुख्यमंत्री डॉ. फारूक अब्दुल्ला यांची कन्या साफिया आणि बहीण सुरय्या यांचा समावेश आहे.

बाबराची चूक दुरुस्त करण्याची हीच वेळ

रामजन्मभूमी वादप्रकरणी हिंदू पक्षाचा न्यायालयात युक्तिवाद

नवी दिल्ली : विजेत्या सम्राट बाबराने भगवान रामाच्या अयोध्येतील जन्मस्थानी मशीद बांधून केलेली चूक आता दुरुस्त करण्याची वेळ आली आहे, असे हिंदू पक्षाने सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी राम जन्मभूमी- बाबरीमशीद वादावर बाजू मांडताना सांगितले. अयोध्या प्रकरणी सुनावणीचा मंगळवारी ३९ वा दिवस होता, उद्या (बुधवार) चाळिसाव्या दिवशी त्याची समाप्ती होणार आहे.

हिंदू पक्षाची बाजू माजी महाधिवक्ता व वरिष्ठ वकील के.पराशरन यांनी मांडली. त्यांनी सांगितले की, 'अयोध्येत अनेक मशिदी आहेत तेथे मुस्लिम लोक नमाज अदा करू शकतात, पण हिंदू रामाचे जन्मस्थान बदलू शकत नाहीत.'

पराशरन यांनी महंमत सुरेश दास यांच्या वतीने सांगितले की, 'बाबराने भारतावर विजय मिळवला व नंतर कायद्यापेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजून भगवान रामाच्या जन्मस्थळी मशीद बांधली ही त्याची चूक होती.' न्या. शरद बोबडे, न्या. धनंजय चंद्रचूड, न्या. अशोक भूषण व न्या. एस.ए. नझीर यांनी पराशरन यांना प्रश्न विचारले. मुस्लिमांच्या मते एकदा जिथे मशीद होती तिथे मशीदच राहू शकते या त्यांच्या विधानास तुमचा पाठिंबा आहे का, असे न्यायालयाने विचारले असता पराशरन यांनी, एकदा जिथे मंदिर होते तिथे मंदिरच राहू शकते असे स्पष्ट केले. मशीद पाडली गेली असली तरी मुस्लिम त्या जागेवर दावा सांगू शकतात, असा मुस्लिमांचा युक्तिवाद आहे.

प्रफुल्ल पटेल यांना 'ईडी'ची नोटीस

(पान १ वरून)

याची पत्नी हजरा मिर्ची हिने पटेल यांच्या कंपनीशी व्यवहार केला होता. तसेच सदनिका खरेदीच्या करारावर प्रफुल्ल पटेल आणि हजरा यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दाऊदच्या सहकाऱ्याच्या पत्नीशी पटेल यांनी आर्थिक व्यवहार केला असून, त्यातून पटेल यांना आर्थिक फायदा झाल्याचे अंमलबजावणी संचालनालयाचे म्हणणे आहे. या व्यवहाराच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी पटेल यांना अंमलबजावणी संचालनालयाने नोटीस बजावली आहे. येत्या शुक्रवारी मुंबई कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्यास पटेल यांना सांगण्यात आले आहे. हवाई वाहतूक मंत्री असताना झालेल्या काही आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात अलीकडेच अंमलबजावणी संचालनालयाने पटेल यांची चौकशी केली होती.

शरद पवारांनंतर पटेल

राज्य विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सहकारी बँकेतील घोटाळाप्रकरणी 'ईडी'ने शरद पवार आणि अजित पवार यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. पवारांच्या विरोधातील गुन्ह्याचा मुद्दा राष्ट्रवादीने तापवला होता. निवडणूक जवळ येऊन ठेपली असतानाच ईडीने प्रफुल्ल पटेल यांना चौकशीसाठी पाचारण केले आहे. हे सारे राजकीय षड्यंत्र असून, सत्ताधारी पक्षाकडून यंत्रणेचा गैरवापर केला जात असल्याचा आरोप पटेल यांनी केला. भाजपने या प्रकरणी राष्ट्रवादीवर दाऊदच्या हस्तकांशी संबंध असल्याचा आरोप केला आहे.

पटेल यांनी आरोप फेटाळले

इक्बाल मिर्ची किंवा त्याच्या कुटुंबीयांशी आपण कोणताही आर्थिक व्यवहार केलेला नसल्याचे पटेल यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. वरळीतील जागा ही पटेल यांच्या कुटुंबीयांनी १९६३ मध्ये खरेदी केली होती. या जागेवर अतिक्रमणे झाली होती. या भूखंडापैकी काही जागेवर एम. के. मोहमद यांचा ताबा होता. मोहमद यांचा हा ताबा उच्च न्यायालयाने मान्य केला होता. मुंबई बॉम्बस्फोटाच्या मालिकेपूर्वी १९९० मध्ये मोहमद यांनी ही जागा इक्बाल मिर्ची याची पत्नी हजरा हिच्या नावावर हस्तांतरित केली होती, असे पटेल यांनी सांगितले. पुढे या जागेतील एक इमारत कोसळली तर दुसऱ्या इमारतीचे नुकसान झाले. या जागेवर पटेल यांच्या कंपनीने इमारत बांधली व तेव्हा जागेचे मालक या नात्याने हजरा मिर्ची यांच्याबरोबर करार करण्यात आला. या करारात कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नसल्याचे पटेल यांचे म्हणणे आहे. ईडीने नोटीस बजावली असल्यास आपण आपली बाजू यंत्रणेपुढे मांडू, असेही त्यांनी सांगितले.

भारताच्या वाट्याचे पाणी पाकिस्तानला नाही- मोदी

चंडीगड : नद्यांमधील भारताच्या वाट्याचे पाणी यापुढे पाकिस्तानात जाऊ दिले जाणार नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरयाणातील चरखी दादरी मतदारसंघात निवडणूक प्रचारसभेत स्पष्ट केले. पाकिस्तानात वाहत जाणाऱ्या नद्यांमधील पाण्याचा प्रत्येक थेंब देशातील शेतकऱ्यांना दिला जाईल आणि त्या दृष्टिकोनातून कामाला सुरुवात झाली आहे, असेही मोदी म्हणाले.

नद्यांमधील ज्या पाण्यावर भारताचा हक्क आहे ते पाणी ७० वर्षांपासून पाकिस्तानमध्ये वाहून जात आहे, यापुढे हे प्रकार आम्ही थांबविणार असून हे पाणी तुमच्या घरात येईल, असेही पंतप्रधान म्हणाले.

जिनपिंग यांनी 'दंगल' पाहिला

चरखी दादरी : चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी 'दंगल' हा चित्रपट पाहिल्याचे आपल्याला सांगितल्याचे मोदी यांनी सांगितले. कन्यांमध्येही किती क्षमता असून शकते ते चित्रपट पाहताना कळले आणि आश्चर्यचकित झालो, असे जिनपिंग यांनी सांगितले. जिनपिंग यांचे शब्द ऐकून आपल्याला हरयाणाबद्दल अभिमान वाटला, असे मोदी म्हणाले.

फेसबुकचे डिजिटल चलन जारी

न्यूयॉर्क : फेसबुकने लिब्रा हे डिजिटल चलन बराच विरोध असतानाही सोमवारी जारी केले आहे. अनेकांनी या प्रकल्पातून माघार घेतली असून अमेरिकी नियंत्रक व राजकीय नेते यांनी या डिजिटल चलनास विरोध केला होता. 'दी लिब्रा असोसिएशन' ही ना नफा संस्था या चलनाचे नियंत्रण करणार असून जीनिव्हा येथे या संस्थेच्या झालेल्या बैठकीत २१ सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. आधी या संस्थेत एकूण २७ सदस्य होते त्यात व्हिसा, मास्टरकार्ड व पेपाल यांचा समावेश आहे. लिब्रा असोसिएशनचे उर्वरित सदस्य हे भांडवली आस्थापने आहेत.

महाराष्ट्र
असेल तुमच्यात स्वाभिमान, विकू नका मतदान.
INCOME TAX DEPARTMENT
रोख किंवा मूल्यवान वस्तुंच्या देवाण घेवाण विषयी कोणतीही माहिती खालील टोल फ्री नम्बर वर दिली जाऊ शकते.
टॉल फ्री नम्बर १८०० २२ १९१०
वॉट्सॲप नम्बर ९३७२७२७८२३ ९३७२७२७८२४
विधानसभा २०१९
निवडणुक आणि आयकर विभाग यांच्या तर्फे जनहितार्थ प्रसारित

'पीएमसी बँके'च्या दोन खातेदारांचा तणावाने मृत्यू

(पान १ वरून)

होते. तर व्यावसायिक असलेले फत्तेमुल पंजाबी मोठी रक्कम बँकेत अडकल्यामुळे प्रचंड चिंतेत होते. ओशिवरा येथे राहणाऱ्या गुलाटी यांच्या खात्यात जवळपास ९० लाख तर मुलुंडमधील फत्तेमुल पंजाबी यांच्या खात्यात १० लाखांहून अधिक रक्कम जमा होती.

पीएमसी बँकेवर आलेल्या निर्बंधांनंतर पैसे परत मिळण्याची शाश्वती वाटत नसल्याने ते दोघेही मानसिक तणावात असल्याची माहिती त्यांच्या परिचितांनी दिली.

संजय गुलाटी यांना काही महिन्यांपूर्वी आर्थिक डबघाईला आलेल्या जेट एअरवेजमधील नोकरी एप्रिलमध्ये गमवावी लागली होती. त्यानंतर काहीच दिवसांत 'पंजाब महाराष्ट्र सहकारी बँके'तील (पीएमसी) आयुष्यभराची हक्काची मिळकतदेखील दैनंदिन खर्चासाठी काढण्यावर निर्बंध आले. त्यामुळे गुलाटी यांची आर्थिक कोंडी झाली होती.

मुलाच्या उपचारांसाठीही हक्काचे पैसे काढता न आल्याचा ताण गुलाटी यांना असह्य झाला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. या मृत्यूस पीएमसी बँक जबाबदार आहे, असा आरोप गुलाटी यांच्या नातेवाईकांनी केला आहे.

मुलुंड येथील फत्तेमुल पंजाबी यांचा स्वतःचा व्यवसाय होता. पीएमसीच्या प्रकरणानंतर त्यांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी आगामी निवडणुकीत 'मतदान करू नका' असे लिहून निषेध व्यक्त केला होता. गेले काही दिवस कौटुंबिक अडचणी आणि पीएमसीत अडकलेल्या रकमेमुळे ते सतत चिंतेत असायचे, असे फत्तेमुल यांचे परिचित गुरजीत यांनी सांगितले.

पीएमसी खातेदारांच्या हक्कांसाठी लढणारे पीएमसी डिपॉझिटर्स फोरमचे अध्यक्ष विश्वास उटगी यांनी या प्रकाराबाबत खंत व्यक्त केली. पीएमसी बँक प्रकरणातून झालेले हे दोन मृत्यू सर्वांसाठीच धक्कादायक बाब आहे. सामान्यांचे बळी जाऊ लागले तरी अजून सरकारला जाग येत नाही. खातेधारक आणि विविध संस्थांचे लाखो-करोडो रुपये अडकल्याने लोक चिंतेत आहेत. अनेकांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे. अजून किती बळी जाण्याची सरकार वाट पाहणार आहे, असा सवाल उटगी यांनी केला आहे. खातेधारकांनी खचून न जाता लढा द्यायला हवा, असे आवाहनही त्यांनी केले.

पत्रकारांच्या वर्तनाबाबत संताप

मुलुंड येथे झालेल्या निदर्शनात फत्तेमुल पंजाबी सक्रिय सहभागी होते. त्यामुळे त्यांच्या निधनाची वार्ता समजताच पीएमसी बँके तील खातेदारांनी आणि आंदोलकांनी मुलुंड येथील त्यांच्या निवासस्थानी धाव घेतली. या वेळी अनेक पत्रकारही उपस्थित होते. परंतु स्थळकाळाचे भान न राखता पत्रकारांनी फत्तेमुल यांच्या घरात शिरकाव करून प्रश्नांचा भडिमार केल्यामुळे नाराजी व्यक्त करत फत्तेमुल यांच्या मुलीने पत्रकारांना बाहेरचा रस्ता दाखवला. वैतागलेल्या त्यांच्या मुलीने 'आमचा पीएमसी बँकेशी काहीही संबंध नाही' असे सांगितले. वास्तवात फत्तेमुल यांचे पीएमसी बँकेत खाते आहे; परंतु पत्रकारांच्या अतिउत्साहामुळे त्यांच्या मुलीचा राग अनावर झाला.

खातेदारांना न्याय देण्याची शिवसेनेची मागणी

पीएमसी बँके संदर्भात शिवसेना खासदारांच्या शिष्टमंडळाने मंगळवारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांची भेट घेतली. या वेळी १८ लाख खातेदारांना लवकरात लवकर न्याय मिळावा यासाठी दास यांना निवेदन देण्यात आले. याशिवाय पीएमसी बँक एखाद्या राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा मोठ्या खासगी बँकेत विलीन करून खातेदारांच्या ठेवी सुरक्षित कराव्यात, लागू केलेल्या निर्बंधांवर विचार व्हावा तसेच ठेवीदारांच्या विम्याची रक्कम १ लाखावरून ५ लाख करावी अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

शक्तिकांत दास यांच्यासोबत झालेल्या या चर्चेत केंद्रीय अवजड उद्योगमंत्री अरविंद सावंत, खा. गजानन कीर्तिकर, खा. राहुल शेवाळे आणि शिवसेनेचे सचिव खा. अनिल देसाई आदी सहभागी झाले होते. शिवसेनेकडून करण्यात आलेल्या सूचनांचे स्वागत करत योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दास यांनी दिले.

MCXCCL

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड

एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०९३, भारत
CIN: U74999MH2008PLC185349 | ई-मेल आयडी: mcx.secretarial@gmail.com | वेबसाईट: https://www.mcxccl.com

३० सप्टेंबर २०१९ रोजी संपलेल्या तिमाही व सहामाहीकरिता अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार

(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० जून २०१९ लेखापरीक्षित	संपलेली तिमाही ३० सप्टेंबर २०१८ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०१९ अलेखापरीक्षित	संपलेली सहामाही ३० सप्टेंबर २०१८ अलेखापरीक्षित	संपलेले वर्ष ३१ मार्च २०१९ लेखापरीक्षित
प्रचालनातून एकूण उत्पन्न	१,९०७.४७	१,५००.८९	४५९.५३	३,४०८.३६	४५९.५३	३,३९३.५८
कालावधीकरिता निव्वळ नफा (कर अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींपूर्वी)	७८२.३९	४८९.७८	२८८.९२	१,२७२.१७	४५०.२१	१,३४०.६७
कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	७८२.३९	४८९.७८	२८८.९२	१,२७२.१७	४५०.२१	१,३४०.६७
कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारण बाबींनंतर)	९२८.७३	३४०.६४	२०६.८५	१,२६९.३७	३२३.३६	९४३.४४
कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	९२९.२०	३४०.१७	२०४.६३	१,२६९.३७	३२१.१४	९५९.६६
समभाग भांडवल (₹ १०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	१४,९९९.००	२३,९९८.५०	१४,९९९.००	२३,९९८.५०
राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	–	–	–	–	–	(२१,२२४.२५)
प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹ १०/- प्रत्येकी)*						
मूलभूत (₹)	०.३९	०.१४	०.१४	०.५३	०.२५	०.५८
सौमिकृत (₹)	०.३९	०.१४	०.१४	०.५३	०.२५	०.५८

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

सूचना:

१) वरील तक्ता, त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. तिमाहीच्या वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप मूळ कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.

२) कंपनीने क्लिअरिंग आणि सेटलमेंट ऑपरेशन्स सप्टेंबर १, २०१८ रोजी सुरू केल्या कारणाने, सप्टेंबर ३०, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीकरीता तुलनात्मक आकडेवारी उपलब्ध नाही.

३) दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी, वरील निष्कर्षांचे पुनरावलोकन लेखापरीक्षा समितीकडून केले गेले आहे आणि संचालक मंडळाच्या बैठकीत त्यांना मान्यता मिळाली आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई | दिनांक: १५ ऑक्टोबर २०१९